# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/सा.प्र./ ८३ /२०२६-२७ दि.२६/०५/२०२६

## //परिपत्रक//

**प्रति,**
**सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय- लोकशाही दिनाबाबत...**

**संदर्भ** : १) शासन परिपत्रक क्र.प्रसुधा-२०११/प्र.क्र.१८९/११/१८-अ, दि.२६ सप्टेंबर २०१२
२) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, ठाणे क्र.सामान्य/कक्ष-१/मेज-४/ठास्थाप्रानिव./कावि-२६/२०२६ यांचे दि.१८/०५/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ शासन परिपत्रकानुसार, सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी / अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी "लोकशाही दिन" राबविण्यात येतो. परंतु संदर्भ क्र. २ नुसार मा. भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषद ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक २०२६ निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला असून दिनांक- १८/०५/२०२६ पासून संपूर्ण ठाणे जिल्हयामध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाले असल्याचे कळविले आहे.

तरी संदर्भ क्र. १ शासन परिपत्रकातीला मुद्दा क्र. ५.७ नुसार ज्या-ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीकरिता आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे, अशा ठिकाणी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये याबाबत आदेशित करण्यात आले आहे. तथापी सदर आदर्श आचारसंहिता संपुष्टात येईपर्यंत लोकशाही दिन रद्द करण्यात येत आहे. याची सर्वांनी नोंद घेण्यात यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव**
**१. मा. आयुक्त, मि.भा.मनपा.**
**२. मा. अतिरीक्त आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा.**

५) अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज

६) तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरूपाची नसेल तर.

७) वरीलप्रमाने जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्विकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबधित विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी ८ दिवसात पाठविण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारास पृष्ठांकीत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| **लोकशाही दिनास कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी हजर रहावे ?** | ५.६) **१) <u>तालुका लोकशाही दिन --</u>**<br>: उपविभागीय अधिकारी<br>: उपविभागीय पोलीस अधिकारी<br>: तहसिलदार<br>: पाटबंधारे विभाग, कृषी विभाग, सहकार विभाग, बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग या विभागांचे तालुका स्तरावरील प्रमुख अधिकारी | २) **(अ) जिल्हाधिकारी लोकशाही दिन**<br>: जिल्हाधिकारी<br>: जिल्हा पोलीस अधिक्षक<br>: जिल्हा पोलीस आयुक्तालय असल्यास पोलिस उपायुक्त दर्जाचा अधिकारी,<br>: मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>: पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषी विभागांचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी<br>: जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी |
| | ३) **विभागीय आयुक्त लोकशाही दिन**<br>: विभागीय आयुक्त<br>: विभागीय स्तरावरील विभागप्रमुख<br>४) **मंत्रालय लोकशाही दिन**<br>: मा. मुख्य सचिव<br>: पोलीस महासंचालक<br>: ज्या विभागाशी संबंधित तक्रार आहे त्या विभागाचे सचिव<br>: सचिव (प्र. सु., र. व का.) | (ब) **महानगरपालिका आयुक्त लोकशाही दिन :-**<br>: महानगरपालिका आयुक्त<br>: जिल्हाधिकारी यांचे वतीने अप्पर जिल्हाधिकारी वा निवासी उपजिल्हाधिकारी<br>: वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस अधिकारी<br>: महानगरपालिकेच्या विभागांचे प्रमुख |

**लोकशाही दिन केव्हां होणार नाही**

५.७ ज्या-ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीकरिता आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे, अशा ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये.

विधिमंडळ अधिवेशन काळात मंत्रालय स्तरावरील “लोकशाही दिन” होणार नाही.

**लोकशाही दिनातील पोचपावती**

५.८ लोकशाही दिनातील नागरींकाकडुन प्राप्त झालेल्या अर्जाची पोचपावती प्रपत्र २ प्रमाणे देण्यात यावी

**लोकशाही दिनी प्राप्त निवेदनावर करावयाची कार्यवाही**

५.९ सर्व स्तरावरील लोकशाही दिनासाठी अर्ज स्विकृत केल्यानंतर ज्या विभागाशी संबंधित तक्रार आहे त्या विभागाच्या विभागप्रमुखांकडे संबंधित अर्ज पाठविण्यात येईल व सदर विभागप्रमुख सदर अर्जातील विनंती बाबत केलेल्या

# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, ठाणे

**अत्यंत तातडीचे**
**निवडणूक प्राथम्य**

क्र. सामान्य/कक्ष-१/मेज-४/ठास्थाप्रानिव./कावि- 26 /२०२६
दिनांक- १८/०५/२०२६

प्रति,
१. मा. आयुक्त महानगरपालिका (सर्व) जिल्हा ठाणे/ पालघर
२. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पालघर
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे/पालघर
४. उपविभागीय अधिकारी उप विभाग (सर्व) जिल्हा ठाणे/ पालघर
५. तहसिलदार (सर्व), जिल्हा ठाणे/ पालघर
६. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जिल्हा ठाणे/ पालघर
७. मुख्याधिकारी नगरपालिका (सर्व)/नगरपंचायत (सर्व), जिल्हा ठाणे/ पालघर

**विषय** :- महाराष्ट्र विधान परिषदद्वारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक -२०२६

**संदर्भ**:- १.मा. भारत निवडणूक आयोग यांचे कडील पत्र क्र.No.322/ECI/INST/FUNC/BIEN-LC/2016, DATE-26th Decmber,2016
२.मा. भारत निवडणूक आयोग यांचे कडील पत्र क्र.No.100/LET/ECI/FUNC/MT-LC-LAC/19/BIEN/2024/2026, DATE-18th May,2026
३.मा. भारत निवडणूक आयोग यांचे कडील पत्र No.ECI/PN/087/2026 DATE-18th May,2026

उपरोक्त विषयान्वये मा. भारत निवडणूक आयोगाकडील संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र विधानपरिषद ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक २०२६ निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला असून दिनांक- १८/०५/२०२६ पासून संपूर्ण ठाणे / पालघर जिल्हयामध्ये आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. सदर आचार संहितेबाबतच्या मा. भारत निवडणूक आयोगाकडील सुचनांची छायांकित प्रत आपले माहितीसाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(रुपाली भालके)
**सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी**
**तथा निवासी उपजिल्हाधिकारी**
**ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ**

१, जिल्हा निवडणूक शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे (प.) ४००६०१.
दुरध्वनी क्र.: ०२२-२५४५४१४२ | ई-मेल: dydeothane@gmail.com | वेबसाईट: www.thaneelection.in